**एफ क्रं. 14011/4/2017-HRD**
**भारत सरकार**
**इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (मेइटी)**

**विषयः प्रधान मंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियानासाठी मार्गदर्शक सूचना (पीएमजीदिशा)**

## 1.0 **योजनेचे नावः** प्रधान मंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान (पीएमजीदिशा)

## 2.0 **डिजिटल साक्षरतेची व्याख्याः** "डिजिटल साक्षरता म्हणजे रोजच्या जीवनात अर्थपूर्ण कार्य करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान समजण्याची आणि वापरण्याची कुठल्याही व्यक्तिची किंवा समाजाची क्षमता".

## 3.0 उद्देशः

ह्या योजनेचा मुख्य उद्देश आहे विविध केंद्र शासित प्रदेश व राज्यात ग्रामीण भागातील सहा कोटी नागरिकांना, एका कुटुंबातील एक व्यक्ति अशा पद्धतीने, ४० टक्के ग्रामीण कुटुंबांना, डिजिटली साक्षर करणे.
ग्रामीण भागातील लोकांना संगणक किंवा डिजिटल उपकरणे (टॅब्लेट, स्मार्ट फोन) कसे वापरावे, इमेल पाठवणे आणि वाचणे, इंटरनेट वापरणे, सरकारच्या सेवा वापरणे, माहिती शोधणे, डिजिटल पेमेन्ट करणे इत्यादी शिकवून त्यांना सक्षम बनविण्याचा उद्देश ह्या योजनेचा आहे. ह्यामुळे त्यांना माहिती तंत्रज्ञान आणि संबंधित ॲप्लिकेशन, प्रामुख्याने डिजिटल पेमेन्ट, वापरुन राष्ट्रनिर्माणात हातभार लावता येईल. ह्या योजनेमुळे डिजिटल डिव्हाइड कमी होईल कारण ही योजना ग्रामीण भागातील लोकांसाठी आहे. ह्या योजनेत समाजातील उपेक्षित घटक जसे अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), दारिद्र्य रेषेखालील घटक (बीपीएल), महिला, दिव्यांग आणि अल्पसंख्यांक समाविष्ट आहेत.

## 4.0 अंमलबजावणी करणारी संस्थाः

सीएससी इ गवर्नन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड, कंपनी कायदा (१९५६) नुसार अनुसूचित एक स्पेशल पर्पझ वेहिकल (एसपीव्ही) आहे (ह्यापुढे 'सीएससी एसपीव्ही' असा उल्लेख केला जाईल). ही संस्था सर्व राज्य सरकार आणि केन्द्र शासित प्रदेश प्रशासनांच्या सहकार्याने आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय ह्यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या योजनेची अंमलबजावणी करेल.

## 5.0 अवधीः

ह्या योजनेची अवधी 31 मार्च, 2019 पर्यंत आहे.

## 6.0 अपेक्षित लाभार्थीः

- **पात्र कुटुंबः** कुटुंबाची व्याख्या म्हणजे एक कुटुंब प्रमुख, बायको अथवा नवरा, मुले आणि आईवडील. ज्या कुटुंबात एकही सदस्य डिजिटली साक्षर नाही अशी सर्व कुटुंब ह्या योजनेसाठी पात्र असतील.
- **प्रवेश निकषः**
  i) लाभार्थी डिजिटली साक्षर नसला पाहिजे
  ii) प्रशिक्षणासाठी प्रत्येक कुटुंबातून एक व्यक्ति पात्र असेल
  iii) वयोमर्यादाः 14 - 60 वर्ष
- कोणाला प्राधान्य दिले जाईलः
  - स्मार्टफोन न वापरणारे, अंत्योदय कुटुंब, महाविद्यालयात न गेलेले, प्रौढ साक्षरता अभियानातील सहभागी
  - नववी ते बारावी मधील शाळकरी मुले जी डिजिटली साक्षर नाहीत, जर त्यांच्या शाळेत संगणक प्रशिक्षण उपलब्ध नसेल तर

- एससी, एसटी, बीपीएल, महिला, दिव्यांग आणि अल्पसंख्यांकांना प्राधान्य दिले जाईल
- डीइजीएस, ग्राम पंचायत आणि गट विकास अधिकाऱ्यांच्या मदतीने सीएससी एसपीव्ही लाभार्थी निवडेल. लाभार्थीची यादी योजनेच्या संकेतस्थळावर दिसेल.

## 7.0 पार्श्वभूमीः

भारताला डिजिटली सक्षम समाज बनविणे आणि देशाला ज्ञान अर्थव्यवस्थेत बदलणे ह्या महत्वाकांक्षी उद्देशाने सरकारने डिजिटल इंडिया कार्यक्रम सुरु केला आहे. ह्या कार्यक्रमाचा उद्देश आहे नागरिकांना विविध इगवरनेन्स प्रकल्पांशी जोडणे, निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करुन घेणे, ज्यामुळे नागरिकांचा सहभाग वाढेल आणि शासनाला जबाबदारीने काम करावे लागेल. डिजिटल भारत कार्यक्रमाचे यश तेव्हाच दिसेल जेव्हा प्रत्येक नागरिकाला डिजिटल सेवा आणि तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता आणि संधी मिळेल, मग ते भारतात कुठेही असो आणि त्यांची सामाजिक परिस्थिती कशीही असो. ह्या सर्व उपक्रमांच्या यशासाठी ग्रामीण क्षेत्रासहित संपूर्ण भारतभर डिजिटल साक्षरता असणे महत्वाचे आहे.

नागरिकांना डिजिटली साक्षर बनविण्यासाठी शासनाने दोन योजना मंजूर केल्या आहेत, राष्ट्रीय डिजिटल साक्षरता मिशन (एनडीएलएम) आणि डिजिटल साक्षरता अभियान (दिशा) ज्याची अंमलबजावणी सीएससी इ गवरनेन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड, (जे कंपनी कायदा (१९५६) नुसार अनुसूचित एक स्पेशल पर्पझ वेहिकल (सीएससी एसपीव्ही) आहे), ह्यांनी केली आहे. दोन्ही योजना मिळून 52.5 लाख प्रमाणित लाभार्थीना डिजिटली साक्षर बनविण्याचे एकूण लक्ष्य डिसेंबर २०१८ मध्ये पूर्ण करायचे होते, जे वेळे आधीच डिसेंबर २०१६ मध्येच पूर्ण झाले.

अर्थसंकल्प २०१६-१७ सादर करताना माननीय अर्थमंत्री ह्यांनी खालील घोषणा केली होती,
*"आपल्या लोकसंख्येचा आपल्याला अधिक लाभ घ्यायला हवा. ग्रामीण भारतात डिजिटल साक्षरता वाढली पाहिजे. १६.८ कोटी ग्रामीण कुटुंबांपैकी १२ कोटी कुटुंबांकडे संगणक नाहीत आणि डिजिटली साक्षर व्यक्ति घरात असण्याची शक्यता पण नाही. डिजिटल साक्षरतेला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने दोन योजना मंजूर केल्या आहेत, राष्ट्रीय डिजिटल साक्षरता मिशन आणि डिजिटल साक्षरता अभियान. आता ग्रामीण भारतासाठी नवीन डिजिटल साक्षरता योजना सुरु करण्याची योजना आहे त्यामुळे अजून ६ कोटी कुटुंब डिजिटली साक्षर होतील. ह्या योजनेचे तपशील लवकरच सांगितले जातील."*

माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पातील घोषणेचा परिपाक म्हणजे ही योजना आहे.

"डिजिटल इंडिया उपक्रम" ह्यात भारत सरकारने परिकल्पित सामर्थ्यवान समाज निर्माण करण्यासाठी डिजिटल साक्षरता महत्वाचा घटक आहे. डिजिटल साक्षरतेच्या इतर फायद्यांमुळे, प्रामुख्याने ग्रामीण भारतात अनेक सामाजिक, आर्थिक समस्यांचे समाधान मिळेल. आरोग्य, रोजगार निर्मिती आणि शिक्षण ह्या क्षेत्रात डिजिटल साक्षरतेमुळे ग्रामीण नागरिकांना लाभ मिळेल.

ह्याशिवाय, सरकारला मोबाइल फोन वापरुन कॅशलेस उलाढालींना प्रोत्साहन द्यायचे आहे, म्हणून अभ्यासक्रमात इलेक्ट्रॉनिक पेमेन्ट प्रणालीसाठी लागणाऱ्या डिजिटल आर्थिक साधनांवर भर दिला जाईल.

## 8.0 योजनेची व्याप्ती

ही योजना देशातील फक्त ग्रामीण भागात लागू होईल. देशात ही योजना प्रभावीपणे लागू करण्यासाठी एकूण ग्रामीण कुटुंबांच्या संख्येवर आधारित राज्य व केन्द्रशासित प्रदेश निहाय लक्ष्य **परिशिष्ट I** मध्ये दिले आहेत. राज्य व केन्द्रशासित प्रदेश निहाय दिलेली लक्ष्य सूचक आहेत आणि राज्य व केन्द्रशासित प्रदेशांच्या कामगिरीनुसार ही लक्ष्य वाढवता येतील. ज्या पंचायती शहरी भागात येतात त्या ह्या योजनेत सहभागी होऊ शकत नाही. ह्या पंचायतींना उद्योग, संस्थांच्या सामाजिक निधीतून मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

ही योजना भारतभर लागू करण्यासाठी ग्राम पंचायत केंदित पद्धत वापरली जाईल. सर्व 2.50 लाख ग्राम पंचायतींना लक्ष्य दिले जाईल, आणि त्याचा नियमितपणे आढावा घेतला जाईल. साधारणपणे प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी 200-300 लाभार्थींचे लक्ष्य परिकल्पित आहे. प्रत्यक्षात जिल्हा, लोकसंख्या, स्थानिक आवश्यकतांचा विचार करुन जिल्हा

दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षेत जिल्हा इगवरनेन्स संस्था (डीइजीएस) प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी लक्ष्य ठरवेल. प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजनेखालील गावांना संपूर्णपणे डिजिटली साक्षर बनविण्याचा प्रयत्न केला जाईल.

## 9.0 अंमलबजावणीचा ढोबळ आराखडा

केंद्र पातळीवर मेइटी योजनेच्या प्रगतीवर लक्ष ठेवेल आणि धोरणात्मक आधार देईल. प्रत्येक राज्यात आणि केंद्र शासित प्रदेशात योजना सुरळीतपणे लागू करण्यासाठी सीएससी एसपीव्ही तिथल्या प्रशासनाला सहकार्य करेल. पीएमजीदिशा योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि निरीक्षण ह्यात महत्वाची भूमिका जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षेखालील जिल्हा इगवरनेन्स संस्थेची (डीइजीएस) असेल. योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि निरीक्षण सीएससी एसपीव्हीला संलग्न असलेले सीएससी, प्रशिक्षण भागीदार आणि केंद्र करतील. अंमलबजावणी आराखड्याची ठळक वैशिष्ठ्ये पुढच्या विभागात दिली आहेत.

**9.1** एनडीएलएम व दिशा योजनांमध्ये केले होते तसेच ह्या योजनेत पण संलग्न प्रशिक्षण भागीदार आणि प्रशिक्षण केंद्रांचा उपयोग केला जाईल. भारतभर प्रशिक्षण भागीदारांची संख्या 2500 पर्यंत आणि प्रशिक्षण केंद्रांची (सीएससी सहित) संख्या 2.5 लाखापर्यंत वाढवण्याचा प्रयत्न असेल. प्रत्यक्षपणे डिजिटल साक्षरता प्रशिक्षण सीएससीला संलग्न असलेले विविध प्रशिक्षण भागीदार व केंद्र मंजूर नियमानुसार देतील. ह्यात सीएससी, एनआयइएलटी केंद्र व त्यांचे अधिकृत केंद्र, एमएचआरडीची आयसीटी@स्कूल ही योजना अंमलात आणणारी प्रौढ साक्षरता केंद्रे व शाळा, आयटी साक्षरता ह्या विषयावर काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, ग्रामीण स्वयं रोजगार प्रशिक्षण केंद्र, कंपन्यांचा सीएसआर निधी इत्यादी समाविष्ट आहे.

**9.2** शक्य असल्यास प्रशिक्षण भागीदार आणि प्रशिक्षण केंद्रांना त्यांच्याच राज्यातील एक विशिष्ट क्षेत्र आणि त्याचे लक्ष्य दिले जाईल. सीएससी एसपीव्ही ने निर्धारित केलेल्या संलग्नतेच्या निकषानुसार प्रशिक्षण भागीदार आणि प्रशिक्षण केंद्रांकडे प्रशिक्षण देण्यासाठी मूलभूत सुविधा असल्या पाहिजे.

### 9.3 प्रशिक्षण भागीदारः

ज्या एनजीओ, संस्था, खाजगी कंपन्यांना सीएससी एसपीव्ही ह्यांचे प्रशिक्षण भागीदार म्हणून, त्याच्या निर्धारित नियमानुसार डिजिटल साक्षरता प्रशिक्षण देण्यात रुची आहे त्यांना संलग्न करण्याची परिकल्पना ह्या योजनेत आहे. प्रस्तावित नियम खालील प्रमाणे आहेतः

- प्रशिक्षण भागीदार भारतात नोंदणीकृत असावा, शिक्षण किंवा आयटी साक्षरता क्षेत्रात तीन वर्षापेक्षा अधिक अनुभव असावा, आयकर क्रमांक (पॅन) असावा, आणि मागील कमीतकमी तीन वर्षांचे लेखापरिक्षित जमाखर्च असावे.
- संस्था किंवा संघटना भारतातील कुठल्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत असावी, उदाः कंपनी असल्यास कंपनी निबंधकाकडे नोंदणीकृत असावी, संस्था असल्यास संस्था निबंधकाकडे नोंदणीकृत असावी, इत्यादी.
- भागीदाराचे स्पष्ट उद्देश असावे, शिक्षण व आयटी साक्षरता प्रशिक्षण ह्याच्या प्रक्रिया आणि पद्धती योग्य रीतीने लिखित स्वरुपात असाव्या.

#### 9.3.1 प्रशिक्षण भागीदाराची भूमिकाः

- निर्धारित जिल्हे, गट, ग्राम पंचायत ह्यामध्ये उमेदवारांना डिजिटल साक्षरता प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र निर्मा ण करण्याची जबाबदारी प्रशिक्षण भागीदाराची असेल.
- योजनेत निर्धारित असलेले आवश्यक घटक प्रशिक्षण केंद्रात आहेत ह्याची खात्री प्रशिक्षण भागीदार करतील.
- त्यांच्या अधीन असलेल्या केंद्रांच्या कामगिरीचे निरीक्षण करण्याची जबाबदारी प्रशिक्षण भागीदाराची असेल.
- त्यांच्या अधीन असलेल्या केंद्रांच्या कामगिरीचे अहवाल अचूकपणे आणि वेळेवर देण्याची जबाबदारी प्रशिक्षण भागीदाराची असेल.
- प्रशिक्षण भागीदारांसाठी तपशिलात नियम सीएससी एसपीव्ही ह्यांनी प्रकाशित केलेल्या मानक कार्यपद्धतीमध्ये नमूद असेल.

## 9.4 प्रशिक्षण केंद्र

निवडलेल्या ग्राम पंचायतीत प्रशिक्षण भागीदार योग्य कर्मचारी आणि पायाभूत सुविधा असलेले प्रशिक्षण केंद्र निर्माण करेल. त्यांनी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेः

- प्रशिक्षण केंद्राला शिक्षण आणि आयटी साक्षरता क्षेत्रात प्रस्थापित प्रशिक्षण अनुभव असावे आणि ते केंद्र भारतातील कुठल्याही नोंदणीकृत संस्थेचे सदस्य असायला हवे.
- प्रशिक्षण केंद्राने कागदपत्रांची पूर्तता केल्यावर सीएससी एसपीव्ही ह्यांनी नियुक्त केलेली चाचणी समिती केंद्राला भेट देईल आणि चाचणी समितीचा समाधानकारक अहवाल मिळाल्यानंतर संलग्नता प्रदान करण्यात येईल.
- प्रशिक्षण केंद्रांसाठी तपशिलात नियम सीएससी एसपीव्ही ह्यांनी प्रकाशित केलेल्या मानक कार्यपद्धतीमध्ये नमूद असेल.

सीएससी एसपीव्हीला निगडित सर्व सीएससी पण प्रशिक्षण केंद्र मानले जातील आणि प्रशिक्षण केंद्रांना लागू असणारे नियम आणि मार्गदर्शक सूचना सीएसएसीना पण लागू होतील.

### 9.4.1 **प्रशिक्षण केन्द्राची भूमिकाः** प्रशिक्षण केन्द्राच्या खालील जबाबदाऱ्या असतीलः

- प्रशिक्षणासाठी विद्यार्थी नोंदवणे
- विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण देणे
- ऑनलाइन मॉनिटरिन्ग ॲप्लिकेशन व लर्निंग मॅनेजमेन्ट सिस्टम वापरुन हजेरी नोंदवणे आणि नियमित मूल्यांकन करणे.
- अभ्याक्रमात सहभागी झालेल्या सर्व उमेदवारांची नोंद ठेवणे, त्यांची हजेरी प्रमाणित करणे आणि विद्यार्थी ऑनलाइन परिक्षा देतील ह्याची खात्री करणे
- प्रशिक्षण संपल्यानंतर प्रशिक्षण केन्द्र दोन वर्षांपर्यंत मदत आणि आधार देईल
- प्रत्येक उमेदवाराला अपेक्षित असलेले कौशल्य प्राप्त झाले ह्याची खात्री करणे

**9.5** मोबाइल फोन वापरुन प्रशिक्षण साहित्य वितरित करण्याची पूरक सुविधा योजली आहे ज्यामुळे नवशिक्या डिजिटली साक्षर व्यक्तिंना प्रशिक्षणात शिकलेल्या घटकांचा सराव करता येईल.

**9.6** लाभार्थीची ओळख पटण्यासाठी आणि एकच लाभार्थी परत परत लाभ घेऊ नये म्हणून आधार क्रमांक वापरणे.

**9.7** पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी भागीदार व केंद्रांना त्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा अहवाल देण्यासाठी व त्यांचे निरीक्षण करण्यासाठी सीएससी एसपीव्ही योग्य ऑनलाइन अहवाल पद्धत निर्माण करेल.

**9.8** प्रशिक्षण भागीदार आणि केंद्र लाभार्थींना त्यांच्या केंद्रात यायला प्रोत्साहित करतील आणि नियमानुसार प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण होईल ह्याची खात्री करतील.

**9.9** प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षण भागीदार व केंद्र नियमितपणे अशा यशस्वी उमेदवारांची माहिती सीएससी एसपीव्ही कडे पाठवतील.

**9.10** प्रशिक्षित उमेदवारांना अधिकृत प्रमाणीकरण संस्थेने आयोजित केलेली ऑनलाइन परिक्षा द्यावी लागेल (प्रशिक्षण संपल्यानंतर लगेच). निर्धारित परिणाम निकषानुसार उमेदवारांना यशस्वीपणे प्रमाणपत्र मिळाल्यावरच सीएससी एसपीव्ही प्रशिक्षणाचा खर्च प्रशिक्षण संस्थांना प्रदान करेल.

**9.11** नॅशनल इंस्टिट्युट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी (एनआयइएलटी), नॅशनल इंस्टिट्युट ऑफ ओपन स्कूलिंग (एनआयओएस), आयसीटी अकॅडमी ऑफ तामिळ नाडू (आयसीटीएसीटी), हरयाणा नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एचकेसीएल), नॅशनल इंस्टिट्युट फॉर एन्ट्रप्रन्युरशिप अँड स्मॉल बिझनेस डेवेलपमेन्ट (एनआयइएसबीयुडी) ह्या राष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त प्रमाणीकरण संस्था प्रशिक्षित उमेदवारांची दूरस्थपणे ऑनलाइन परिक्षा घेतील. अशा ऑनलाइन

परिक्षा घ्यायचा अनुभव असलेल्या इतर संस्थांना पण निर्धारित नियमानुसार योजनेत समाविष्ट करता येईल. प्रमाणीकरण प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी प्रत्येक राज्यात एक तरी प्रमाणीकरण संस्था असेल असा प्रयत्न करण्यात येईल.

## 9.12 उद्योग, सेवाभावी संस्था, इतर ह्यांच्या आयटी साक्षरता प्रयत्नांचे एकत्रीकरणः

उद्योग, सेवाभावी संस्था, इतर ह्यांच्या आयटी साक्षरता प्रयत्नांचे एकत्रीकरण ह्या योजनेत करण्यात येईल. सीएससी एसपीव्ही ह्याविषयी समन्वय साधेल. अशा भागीदार, उद्योग, सेवाभावी संस्थांकडे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांचा अधिकृत प्रमाणीकरण संस्थांतर्फे डिजिटल साक्षरता प्रमाणपत्र देण्यासाठी विचार करण्यात येईल. अशा उमेदवारांचे प्रशिक्षण त्या संस्था त्यांच्या स्वतःच्या निधीतून किंवा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून करतील. अशा उपक्रमात प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिकृत प्रमाणीकरण संस्थांतर्फे आयेजित प्रमाणीकरण परिक्षांना बसता येईल आणि ह्यासाठीचा खर्च ती संस्थाच करेल.

## 9.13 विविध संस्थांची भूमिका आणि जबाबदारीः

### 9.13.1 मेइटीः

i. सचिव मेइटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित **उच्चाधिकार समिती** योजनेसाठी आवश्यक धोरणात्मक पातळीवरील निर्णय घेईल.
ii. योजनेची वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करण्यासाठी आणि निधी प्रदान करण्याची शिफारस देण्यासाठी मेइटीने संयुक्त सचिव (एचआर) ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक प्रकल्प आढावा आणि सुकाणू गट (पीआरएसजी) स्थापित केले आहे.
iii. पीआरएसजीच्या शिफारसीवर, किंवा मेइटीच्या मूल्यांकनानंतर, किंवा मेइटीच्या मंजूरीने अंमलबजावणी संस्थांना आवश्यक निधी उपलब्ध करुन देणे.
iv. योजनेच्या विकासाशी निगडित मुद्दे जलद निकाली काढण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, संबंधित सरकारी विभाग, संस्था, संघटना ह्यांच्याशी समन्वय साधणे.
v. योजनेशी निगडित इतर समस्या, मुद्दे ह्याकडे लक्ष देणे.

### 9.13.2 कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (पीएमयु):

पीएमजीदिशा योजना राबविण्यासाठी सीएससी इगवरनेन्स सर्विसेस इंडिया लिमिटेड (सीएससी एसपीव्ही) ह्यांच्या अधीन असलेले एक कार्यक्रम व्यवस्थापन युनिट (पीएमयु) निर्माण करण्यात येईल. योजनेची अंमलबजावणी, व्यवस्थापन आणि निरीक्षण ह्यासाठी पीएमयु मेइटीला सहकार्य करेल. सीएससी एसपीव्ही : पीएमयुच्या मुख्या जबाबदाऱ्या व कार्य खालील प्रमाणे असतीलः

i. संपूर्ण योजनेचा समन्वय, अंमलबजावणी आणि व्यवस्थापन करणे.
ii. पीएमजीदिशा सारख्या इतर उपक्रमांशी निगडित असलेले उद्योग, सेवाभावी संस्था अशा सर्व भागधारकांशी समन्वय साधणे.
iii. विविध भागधारक आणि तज्ञांच्या सल्ल्याने अभ्यासक्रम आराखडा, प्रशिक्षणाचे साहित्य विकसित करणे.
iv. एनआयइएलटी, इग्नोउ, एनआयओएस इत्यादी ह्यांच्या सल्ल्याने प्रशिक्षण पायाभूत सुविधा, प्रशिक्षक, शिक्षक इत्यादी साठी प्रशिक्षण संस्थांच्या संलग्नतेच्या मार्गदर्शक सूचना आणि नियम तयार करणे. प्रशिक्षणाचा दर्जा, प्रशिक्षक, केंद्रातील सुविधा ह्याच्या नियमित मूल्यांकन आणि निरीक्षणासाठी नियम निर्माण करणे.
v. लाभार्थी निवडणे, उमेदवार नोंदणी, प्रशिक्षणाचे निरीक्षण ह्यासाठी नियम विकसित करणे.
vi. प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थांशी सहकार्य करुन परिक्षा आणि प्रमाणीकरण अटी तयार करणे.
vii. मोबाइल फोन वापरुन इ कन्टेन्ट वितरित करणे.
viii. योजनेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्व भागधारकांसाठी कार्यशाळा व परिसंवाद व जनजागृती मोहिम राबवणे.
ix. अभिलेखात लबाडी होऊ नये आणि योग्य निरीक्षण व्हावे ह्यासाठी आधार क्रमांक निगडित योग्य निरीक्षण पद्धती निर्माण करणे.

x. योजनेच्या निरीक्षणासाठी मेइटी आणि राज्य सरकार व जिल्हा प्रशासनाला नियमितपणे माहिती देणे.

xi. दिलेल्या अवधीत आणि निधीत सर्व अपेक्षित कार्य पूर्ण करण्याची खात्री करणे. कुठलेही बदल असल्यास मंजूर करुन घेण्यासाठी मेइटीकडे पाठविले जाईल.

xii. लाभार्थीची आधार क्रमांक निगडित नोंदणी आणि परिक्षा घेण्यासाठी योग्य पद्धत ठरविणे.

xiii. मेइटीने मंजूर केलेली स्वतंत्र संस्था प्रभाव मूल्यांकनाचा अभ्यास करेल.

xiv. ओपन सोर्स तंत्रज्ञान वापरुन एक केंद्रीय संकेतस्थळ विकसित करणे. ह्या संकेतस्थळावर एक कंटेन्ट मॅनेजमेन्ट सिस्टम असेल, ज्यात i) प्रशिक्षण भागीदार किंवा केंद्र म्हणून काम करण्यासाठी कागदपत्रे अपलोड करता येतील, ii) डॅशबोर्ड वापरता येईल, iii) उमेदवारांची नोंदणी व त्यात बदल करता येईल, iv)साहित्याचा केंद्रीय साठा असेल, v) आधार क्रमांकावर आधारित दूरस्थ पद्धतीने डिजिटल साक्षरतेचे मूल्यांकन आणि प्रमाणीकरण होईल, vi) माहिती शोधता येईल, vii) अहवाल बघता येईल.

xv. प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी २२ अनुसूचित भाषांमध्ये एक मोबाइल ॲप निर्माण करणे.

xvi. खालील प्रक्रियांसाठी मानक कार्यपद्धती उपलब्ध करुन देणेः

- पीएमजीदिशा मध्ये उमेदवारांची नोंदणी आणि प्रशिक्षण
- पीएमजीदिशा मध्ये प्रशिक्षण भागीदार व केंद्र समाविष्ट करणे किंवा काढून टाकणे
- पीएमजीदिशा मध्ये परिक्षा
- पीएमजीदिशा पेमेन्ट प्रक्रिया

xvii. सचिव, मेइटी ह्यांच्या अध्यक्षतेखालील सीएससी एसपीव्ही मंडळ योजनेच्या अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घेणे.

**9.13.3** राज्य व केंद्र शासित प्रदेश सरकारः

(i) प्रमुख सचिव (आयटी) ह्यांच्या अध्यक्षतेखालील राज्य पातळीवरची समिती अंमलबजावणीसाठी योजना निर्माण करेल. **परिशिष्ट II** मधील **विभाग I** मध्ये समितीचे सदस्य आणि संदर्भ अटी दिल्या आहेत.

(ii) **राज्य अंमलबजावणी संस्था (एसआयए)**: राज्य व केंद्र शासित प्रदेशाने नियुक्त केलेल्या अंमलबजावणी संस्थांकडून ही अपेक्षा असेल की त्यांनी निर्धारित अवधीत योजना अंमलात आणून लक्ष्य साध्य करावे. राज्य व केंद्र शासित प्रदेशाने नियुक्त केलेल्या अंमलबजावणी संस्थांची भूमिका खालील प्रमाणे असेलः

i. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य व केंद्र शासित प्रदेशाच्या वतीने एसआयए सीएससी एसपीव्ही बरोबर एक एमओयू करेल.

ii. राज्य व केंद्र शासित प्रदेशात उपलब्ध असलेल्या संसाधनांचा लाभ सीएसएसी एसपीव्हीला देणे.

iii. योग्य उमेदवार निवडण्यासाठी विविध संस्थांना सहकार्य करणे, त्यांच्याशी संवाद साधून समन्वय निर्माण करणे.

iv. योजनेचे निरीक्षण करण्यासाठी विविध राज्य, जिल्हा, पंचायत स्तरावरच्या समिती स्थापित करण्यासाठी विविध सरकारी संस्था व भागधारकांना सहकार्य करणे, त्यांच्याशी संवाद साधून समन्वय निर्माण करणे.

v. पंचायत स्तरावर प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी विविध प्रशिक्षण केंद्र (सीएससी एसपीव्हीच्या सल्ल्याने) निवडणे, त्यांना सहकार्य करणे, त्यांच्याशी समन्वय साधणे.

vi. नजिकच्या डिजिटल साक्षरता प्रशिक्षण केंद्राकडे उमेदवारांना पाठविणे.

(iii) जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी ह्यांच्या अध्यक्षतेखालील **जिल्हा स्तरावरील समिती** गटस्तरावर अंमलबजावणीची देखरेख करेल. **परिशिष्ट II** मधील **विभाग II** मध्ये समितीचे सदस्य आणि संदर्भ अटी दिल्या आहेत.

**9.13.4 प्रमाणपत्र देणाऱ्या संस्था जसे एनआयइएलआयटी, एनआयओएस, एचकेसीएल, आयसीटीएसीटी, एनआयइएसबीयुडी इत्यादीः**

i. सीएससी एसपीव्ही ह्यांच्या सल्ल्याने डिजिटल साक्षरता प्रशिक्षणाची रचना, विकास, वितरण, मूल्यांकन आणि प्रमाणीकरण ह्यासाठी यंत्रणा, मानक आणि मार्गदर्शक सूचना निर्माण करणे.

ii. डिजिटल साक्षरतेविषयी लाभार्थीच्या सक्षमतेचे मूल्यांकन आणि ते प्रमाणित करणे

**9.13.5** प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांसाठी विविध सरकारी किंवा खाजगी शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठ ह्यांना सहभागी करुन घेण्याचा विचार सीएससी एसपीव्ही करु शकते.

## 10.0 डिजिटल साक्षरता प्रशिक्षण आणि प्रशिक्षण अवधी:

### 10.1 प्रशिक्षण अभ्यासक्रमाची ढोबळ रुपरेषा:

| **सत्राचे नाव** |
|---|
| डिजिटल उपकरणांची ओळख |
| डिजिटल उपकरण वापरणे |
| इंटरनेटची ओळख |
| इंटरनेट वापरुन संवाद साधणे |
| इंटरनेटचे उपयोग<br>(नागरी सुविधा सेवा, कॅशलेस उलाढाली करण्यासाठी डिजिटल आर्थिक साधने) |
| **एकूण अवधी : 20 तास** |

### 10.2 प्रशिक्षणाचा परिणाम , क्षमतेचे मानकः

- डिजिटल उपकरणांचे मूलभूत घटक समजणे (व्याख्या, कसे वापरावे, त्याची काय क्षमता आहे)
- माहिती शोधणे, निर्माण करणे, त्याचे व्यवस्थापन करणे, आणि ती इतरांना उपलब्ध करुन देणे ह्यासाठी डिजिटल उपकरण वापरणे
- प्रभावीपणे आणि जबाबदारीने इंटरनेट ब्राउझ करणे
- प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी तंत्रज्ञान वापरणे
- डिजिटल आर्थिक उपकरणे (युएसएसडी, युपीआय, इवॉलेट, एइपीएस, कार्ड, पीओएस) वापरुन कॅशलेस उलाढाली करणे
- डिजिटल लॉकर वापरणे
- ऑनलाइन नागरी सेवा वापरणे
- रोजच्या जीवनात, सामाजिक आयुष्यात आणि कामाच्या ठिकाणी डिजिटल तंत्रज्ञानाचे महत्व समजणे

10.3 सीएससी एसपीव्ही विविध भागदारांचा सल्ला घेऊन प्रशिक्षणाचे साहित्य निर्माण करेल, ते एकत्र करेल, त्याचे व्यवस्थापन करेल, साहित्याचा साठा निर्माण करेलः

i. डिजिटल साक्षरता प्रशिक्षणासाठी निर्माण करण्यात येणारे प्रशिक्षणाचे साहित्य इंग्रजी व्यतिरिक्त २२ इतर भाषांमध्ये उपलब्ध करण्यात येईल. २२ अनुसूचित भाषांमध्ये एक मोबाइल ॲप निर्माण करण्यात येईल ज्यामुळे प्रशिक्षणाचे साहित्य हवे तेव्हा डाउनलोड करुन अनेकदा वापरता येईल.

ii. ज्या व्यक्तिंना लिहिता वाचता येत नाही त्यांच्यासाठी ऑडियो, विजुअल, टच आधारित साहित्य निर्माण करावे. ज्या व्यक्तिंना लिहिता वाचता येते त्यांच्यासाठी लिखित, ऑडियो, व्हिडिओ, आणि ॲप्लिकेशन आधारित साहित्य निर्माण करावे. स्थानिक संसाधने वापरुन विशिष्ट लाभार्थींसाठी साहित्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

iii. अभ्यासक्रमात खालील महत्वाच्या नागरिक सेवा समाविष्ट असतातः
   - जी२सी सेवा जसे जात प्रमाणपत्र, डोमिसाइल प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र
   - युआयडीएआय सेवा
   - बँकिंग सेवा
   - आयआरसीटीसी रेल्वे आरक्षण
   - विमा
   - टेलिफोन डेटा कार्ड रिचार्ज
   - निवडणूक आयडी छापणे
   - विजेचे शुल्क भरणा करणे

- पॅन कार्ड
- पासपोर्ट

iv. सरकारला मोबाइल फोन वापरुन कॅशलेस उलाढालींना प्रोत्साहन द्यायचे आहे, म्हणून अभ्यासक्रमात डिजिटल वॉलेट, मोबाइल बँकिंग, युनिफाइड पेमेन्ट इंटरफेस (युपीआय), अनस्ट्रक्चर्ड सप्लिमेन्टरी सर्विस डेटा (युएसएसडी) आणि आधार एनेबल्ड पेमेन्ट सिस्टम (एइपीएस), पीओएस इत्यादी वर भर असावा.

v. लाभार्थी आणि प्रशिक्षक ह्यांच्या कडून योग्य अभिप्राय मागविला जाईल आणि त्यानुसार अभ्यासक्रमात बदल केले जातील म्हणजे प्रशिक्षणार्थींना लाभ मिळेल.

vi. डिजिटल अॅक्सेस उपकरण (संगणक, टॅब्लेट इत्यादी) वापरणे, इंटरनेट ब्राउझर उघडणे, माहिती शोधणे, ऑडियो आणि व्हिडियो बघणे ह्यावर भर दिला जाईल.

vii. ह्या क्षेत्रातील इतर संस्थांनी निर्माण केलेल्या डिजिटल साक्षरता अभ्यासक्रमांचा सुद्धा विचार करता येईल.

viii. एनआयइएलआयटी, इग्नोऊ, एनआयओएस, युनेस्को, डीइएफ, आयटी फॉर चेन्ज, आयआयएमसी, इन्टेल, नॅस्कॉम, एनआयआयटी, पीएमजीदिशा भागीदार ह्यामधील व्यक्ति एकत्र करुन एक तांत्रिक समितीचे स्थापन सीएससी एसपीव्ही करेल. ही समिति अभ्यासक्रम मंजूर करेल. ग्रामीण भागातील लोकांसाठी उपयोगी असे अनेक भाषांमधील साहित्य सीएससी एसपीव्ही निर्माण करेल.

## 11.0 आर्थिक मदतः

**11.1 प्रशिक्षण शुल्कः** ज्या प्रशिक्षण भागीदार किंवा केन्द्रांमधील प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र मिळतील त्यांना सीएससी एसपीव्ही प्रत्येक यशस्वी प्रशिक्षणार्थीसाठी रु 300/- देईल.

लागलेले निकाल आणि डीइजीएस ह्यांच्या कडून अभिप्राय योग्य असतील तरच संस्थांना निधी वितरित केला जाईल. नवीन इमेल अकाउंट उघडणे, इमेल पाठवणे, डिजिटल लॉकर उघडणे, रेल्वे इ तिकिट काढणे, विजेचे किंवा पाण्याचे शुल्क इंटरनेटवर भरणे, पासपोर्टसाठी अर्ज करणे, डिजिटल पेमेन्ट करणे, प्रशिक्षणार्थीने इ केवायसी सुरु करणे, जी२सी सेवा जसे पॅन कार्डसाठी अर्ज करणे, मोबाइल रिचार्ज, एइपीएस, युएसएसडी, युपीआय, इ वॉलेट वापरणे इत्यादी ह्यात समाविष्ट होऊ शकते.

**11.2 परिक्षा शुल्क व प्रमाणीकरण शुल्कः** प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी परिक्षा शुल्क रु 70/- असेल. हे शुल्क प्रशिक्षणार्थींचे मूल्यांकन आणि प्रमाणीकरण करणाऱ्या संस्थांना देय असेल.

**11.3 राज्य आणि केन्द्रशासित प्रदेशांना आर्थिक मदतः** प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी सरासरी रु २ इतकी मदत सीएससी एसपीव्ही राज्य अंमलबजावणी संस्थांना वरखर्च आणि योजना निरीक्षण करण्यासाठी देईल.

**12. परिणाम मूल्यांकन अध्ययनः** स्वतंत्र संस्था परिणाम मूल्यांकन अध्ययन करेल. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय योग्य संस्था किंवा संघटनांना परिणाम मूल्यांकन अध्ययन करण्यास सांगेल.

**13.** राज्य, जिल्हा, उपजिल्हा (गट), ग्राम पंचायत ह्यामधील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक ह्यांना सहभागी करुन सीएससी एसपीव्ही योजनेचे **सामाजिक लेखा परिक्षण** करेल. नियमितपणे योजनेचे सामाजिक आणि परिणाम लेखापरिक्षण करण्यासाठी सीएससी एसपीव्ही महाविद्यालय आणि विद्यापीठांशी भागीदारी करु शकते.

**14.** ह्या योजनेतील ६ कोटी लाभार्थींची माहिती कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, राज्य कौशल्य विकास संस्था, क्षेत्र कौशल्य परिषद ह्यांना दिली जाईल म्हणजे त्यांना ही माहिती त्यांच्या इतर कौशल्य विकास योजनांशी जोडता येतील जेणेकरुन भारतभर कौशल्य आणि रोजगार संधींचे जाळे उभे राहील.

परिशिष्ट -I

**डिजिटल साक्षरतेची राज्य व केन्द्रशासित प्रदेश निहाय लक्ष्य**

| **क्रं** | **राज्य व केन्द्रशासित प्रदेश** | **लक्ष्य** |
|---|---|---|
| 1 | उत्तर प्रदेश | 11171000 |
| 2 | बिहार | 6630000 |
| 3 | पश्चिम बंगाल | 4481000 |
| 4 | महाराष्ट्र | 4433000 |
| 5 | मध्य प्रदेश | 3784000 |
| 6 | राजस्थान | 3712000 |
| 7 | कर्नाटक | 2705000 |
| 8 | तामिळनाड | 2679000 |
| 9 | ओडिशा | 2517000 |
| 10 | गुजरात | 2497000 |
| 11 | आंध्र प्रदेश | 2028000 |
| 12 | तेलंगणा | 2028000 |
| 13 | आसाम | 1929000 |
| 14 | झारखंड | 1803000 |
| 15 | छत्तीसगढ | 1412000 |
| 16 | केरळ | 1257000 |
| 17 | पंजाब | 1247000 |
| 18 | हरयाणा | 1191000 |
| 19 | जम्मू आणि कश्मीर | 658000 |
| 20 | उत्तराखंड | 506000 |
| 21 | हिमाचल प्रदेश | 444000 |
| 22 | त्रिपुरा | 195000 |
| 23 | मेघालय | 171000 |
| 24 | मणिपूर | 137000 |
| 25 | नागालँड | 101000 |
| 26 | अरुणाचल प्रदेश | 77000 |
| 27 | गोवा | 40000 |
| 28 | मिझोराम | 38000 |
| 29 | सिक्किम | 33000 |
| 30 | राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, दिल्ली | 30000 |
| 31 | पुडुचेरी | 28000 |
| 32 | अंडमान आणि निकोबार | 18000 |
| 33 | दादरा आणि नगर हवेली | 13000 |
| 34 | दमण आणि दिऊ | 4000 |
| 35 | चंदीगढ | 2000 |
| 36 | लक्ष्यद्वीप | 1000 |
|  | **एकूण** | **60000000** |

**टीपः राज्य व केन्द्रशासित प्रदेश ह्यांचे लक्ष्य कामगिरीवर अवलंबून असतील**

शहरी भागातील गांवाना ह्या योजनेत समाविष्ट केले जाणार नाही (यादी खालील प्रमाणे)

**ह्या योजनेत समाविष्ट नसलेली शहरे**

| क्रं | राज्याचे नाव | शहराचे नाव | शहराची लोकसंख्या (२०११ गणनेनुसार) |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र | बृहन्मुंबई (मनपा) | 1,24,78,447 |
| 2 | राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, दिल्ली | डीएमसी (यू) (मनपा) | 1,10,07,835 |
| 3 | कर्नाटक | बृहत् बंगलुरु महानगरपालिका (बीबीएमपी) (मनपा) | 84,25,970 |
| 4 | आंध्र प्रदेश | बृहन हैद्राबाद (मनपा) | 68,09,970 |
| 5 | गुजरात | अहमदाबाद (मनपा) | 55,70,585 |
| 6 | तामिळनाड | चेन्नई (मनपा) | 46,81,087 |
| 7 | पश्चिम बंगाल | कोलकाता (मनपा) | 44,86,679 |
| 8 | गुजरात | सूरत (मनपा) | 44,62,002 |
| 9 | महाराष्ट्र | पुणे (मनपा) | 31,15,431 |
| 10 | राजस्थान | जयपूर (मनपा) | 30,73,350 |
| 11 | उत्तर प्रदेश | लखनऊ (मनपा) | 28,15,601 |
| 12 | उत्तर प्रदेश | कानपूर (मनपा) | 27,67,031 |
| 13 | महाराष्ट्र | नागपूर (मनपा) | 24,05,421 |
| 14 | मध्य प्रदेश | इंदोर (मनपा) | 19,60,631 |
| 15 | महाराष्ट्र | ठाणे (मनपा) | 18,18,872 |
| 16 | मध्य प्रदेश | भोपाल (मनपा) | 17,95,648 |
| 17 | आंध्र प्रदेश | बृहत विशाखापटनम महानगरपालिका (मनपा) | 17,30,320 |
| 18 | महाराष्ट्र | पिंपरी चिंचवड (मनपा) | 17,29,359 |
| 19 | बिहार | पटना (मनपा) | 16,83,200 |
| 20 | गुजरात | वडोदरा (मनपा) | 16,66,703 |
| 21 | पंजाब | लुधियाना (मनपा) | 16,13,878 |
| 22 | उत्तर प्रदेश | आग्रा (मनपा) | 15,74,542 |
| 23 | महाराष्ट्र | नाशिक(मनपा) | 14,86,973 |
| 24 | हरयाणा | फरिदाबाद (मनपा) | 14,04,653 |
| 25 | उत्तर प्रदेश | मेरठ (मनपा) | 13,09,023 |
| 26 | गुजरात | राजकोट (मनपा) | 12,86,995 |
| 27 | महाराष्ट्र | कल्याण डोंबिवली (मनपा) | 12,46,381 |
| 28 | महाराष्ट्र | वसइद्द विरार शहर (मनपा) | 12,21,233 |
| 29 | उत्तर प्रदेश | वाराणसी (मनपा) | 12,01,815 |
| 30 | जम्मू आणि कश्मीर | श्रीनगर (मनपा) | 11,92,792 |
| 31 | महाराष्ट्र | औरंगाबाद (मनपा) | 11,71,330 |
| 32 | झारखंड | धनबाद (मनपा) | 11,61,561 |
| 33 | पंजाब | अमृतसर (मनपा) | 11,32,761 |
| 34 | महाराष्ट्र | नवी मुंबई (मनपा) | 11,19,477 |

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | उत्तर प्रदेश | अलाहबाद (मनपा) | 11,17,094 |
| 36 | झारखंड | रांची (मनपा) | 10,73,440 |
| 37 | पश्चिम बंगाल | हावडा (मनपा) | 10,72,161 |
| 38 | तामिळनाड | कोइमबतूर (मनपा) | 10,61,447 |
| 39 | मध्य प्रदेश | जबलपूर (मनपा) | 10,54,336 |
| 40 | मध्य प्रदेश | ग्वालियर (मनपा) | 10,53,505 |
| 41 | आंध्र प्रदेश | विजयवाडा (मनपा) | 10,48,240 |
| 42 | राजस्थान | जोधपूर (मनपा) | 10,33,918 |
| 43 | तामिळनाड | मदुरई (मनपा) | 10,16,885 |
| 44 | छत्तीसगढ | रायपूर (मनपा) | 10,10,087 |
| 45 | राजस्थान | कोटा (मनपा) | 10,01,365 |
| 46 | आसाम | गुवाहाटी (मनपा) | 9,63,429 |
| 47 | चंदीगढ | चंदीगढ (मनपा) | 9,60,787 |
| 48 | महाराष्ट्र | सोलापूर (मनपा) | 9,51,118 |
| 49 | कर्नाटक | हुबळी धारवाड *(मनपा) | 9,43,857 |
| 50 | उत्तर प्रदेश | बरेली (मनपा) | 8,98,167 |

**परिशिष्ट -II**

**पीएमजीदिशा योजनेअंतर्गत राज्यांनी स्थापन करायच्या समिती**

## I. राज्य स्तरावर समिती – [राज्याचे प्रमुख सचिव किंवा केन्द्रशासित प्रदेशाचे प्रशासक ह्यांनी स्थापन करणे]

**<u>सदस्य</u>**

**अध्यक्ष - प्रधान सचिव (आयटी)**

**सदस्य:**

1. मूलभूत शिक्षण विभागाचे प्रतिनिधी
2. पंचायती राजचे प्रतिनिधी
3. समाज कल्याणचे प्रतिनिधी
4. महिला व बाल विकासाचे प्रतिनिधी
5. राज्य अंमलबजावणी संस्थेचे (एसआयए) प्रतिनिधी
6. स्टेट इन्फोर्मेटिक्स ऑफिसर एसआयओ, एनआयसी
7. सीएससी एसपीव्हीचे प्रतिनिधी
8. विशेष सचिव (आयटी), संयुक्त सचिव (आयटी) – सदस्य सचिव

- अध्यक्षाच्या परवानगीने समितीला योग्य वाटणाऱ्या व्यक्तिंना विशेष आमंत्रित म्हणून त्यांच्या बैठकांमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण समिती देऊ शकते.

**<u>संदर्भ अटी</u>**

- समितीच्या संदर्भ अटी खालील प्रमाणे असतील:
  - राज्यात पीएमजीदिशा योजनेची अंमलबजावणी कशी होत आहे ह्याचे नियमितपणे निरीक्षण
  - उपस्थित केलेल्या समस्यांवर पुढील कार्यवाही सुचवणे, राज्य स्तरावर योजना अंमलात आणणाऱ्या प्रशिक्षण केन्द्रांना व भागीदारांना येणाऱ्या समस्या
  - राज्य स्तरावर योजना अंमलात आणताना आलेल्या इतर समस्या
- समितीची बैठक दोन महिन्यातून एकदा होईल.

## II. जिल्हा स्तरावर समिती - [राज्याने किंवा केन्द्रशासित प्रदेशाने स्थापन करणे]

**<u>सदस्य</u>**

**अध्यक्ष - जिल्हा दंडाधिकारी किंवा जिल्हाधिकारी**

**सदस्य:**

1. मूलभूत शिक्षण विभागाचे प्रतिनिधी
2. महिला व बाल विकासाचे प्रतिनिधी
3. राज्य अंमलबजावणी संस्थेचे (एसआयए) प्रतिनिधी
4. जिल्हा इ गवरनेन्स सोसायटीचे प्रतिनिधी
5. जिल्हा इन्फोर्मेटिक्स अधिकारी (डीआयओ) एनआयसी
6. गट विकास अधिकारी
7. सीइओ – जिल्हा पंचायत
8. जिल्हा समन्वयक सीएससी एसपीव्ही – सदस्य सचिव

- अध्यक्षाच्या परवानगीने समितीला योग्य वाटणाऱ्या व्यक्तिंना विशेष आमंत्रित म्हणून त्यांच्या बैठकांमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण समिती देऊ शकते.

**<u>संदर्भ अटी</u>**

- समितीच्या संदर्भ अटी खालील प्रमाणे असतील:
  - प्रत्यक्षात योजना कशी अंमलात आणली जात आहे ह्याची देखरेख आणि निरीक्षण
  - उपस्थित केलेल्या समस्यांवर पुढील कार्यवाही सुचवणे, जिल्हा व गट स्तरावर योजना अंमलात आणणाऱ्या प्रशिक्षण केन्द्रांना आणि भागीदारांना येणाऱ्या समस्या
  - जिल्हा किंवा गट स्तरावर योजना अंमलात आणताना आलेल्या इतर समस्या
- जिल्हा समितीची महिन्यातून एकदा तरी बैठक होईल